रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ६४

दैनिक **लोकनेता** बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 | Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

## मोदी-शहांनी अवघा महाराष्ट्र लुटला

# मुलगी शिकली,प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली,हा विकास आहे?-उद्धव ठाकरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड (वृत्तसंस्था)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट हल्ला चढवला. नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी अवघा महाराष्ट्र लुटला. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात मते मागण्यासाठी जागोजागी फिरत आहेत, असे ते म्हणालेत. मुलगी शिकली, प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे का? असा उपरोधिक टोलाही त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधताना हाणला.

उद्धव ठाकरे यांची शनिवारी नांदेड जिल्ह्यातील लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी भाजप महायुतीवर विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट टीका केली. ते म्हणाले, नरेंद्र मोदी व अमित शहांना आता महाराष्ट्राची आठवण झाली आहे. आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र केवळ लुटण्यासाठी आहे असे वाटत होते. पण आता महाराष्ट्रातील लोकांना मतदानाचा अधिकार आहे हे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यानुसार आता ते इथे येऊन मतांचा जोगवा मागत आहेत.या लोकांनी महाराष्ट्राचे सर्व उद्योग लुटून गुजरातला नेता आणि आता निर्लज्जपणे महाराष्ट्राची मते मागता? तुम्हाला काय वाटते? तुम्ही काही केले तरी चालले आणि महाराष्ट्र केविलवाणेपणाने मत देईल? ही लढाई केवळ उद्धव ठाकरे व शिवसेनेची नाही. आपल्याला सत्ता पाहिजे. पण हे सर्व केवळ महाविकास आघाडीसाठी नाही तर येथील सर्वसामान्य जनतेसाठी आपल्याला सत्ता हवी आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपने आता बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला आहे. कोण कापणारे आहेत? जे काही कापणारे आहेत ते तुमच्यासोबत सत्तेत बसलेले आहेत. त्यांनी माझ्या एका कार्यकर्त्याचे केवळ फेसबुक पोस्ट टाकली म्हणून बोटे कापली. ज्यांनी माझ्या कार्यकर्त्याची बोटे कापली, त्यांना आम्ही आता राजकारणात कापणार आहोत, असे उद्धव ठाकरे यावेळी माजी खासदार तथा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांना इशारा देत म्हणाले. चिखलीकर यांच्यावर ठाकरे गटाच्या एका कार्यकर्त्याची बोटे छाटल्याचा आरोप आहे.मोदी येथे आले तर त्यांना हा माझा बोटे कापलेला कार्यकर्ता दाखवा. त्यांना विचारा कोण आहे हा? काय त्याचा गुन्हा? विरोधात पोस्ट टाकली म्हणून त्याचे बोटे छाटता? त्याने तर पोस्ट टाकली, मी तर तुमच्याविरोधात उघडपणे बोलत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोटे छाटलेल्या पीडित कार्यकर्त्याला आपल्याजवळ बोलावले. तसेच त्याला त्याच्यावर बेतलेल्या प्रसंगाचा बदला मी स्वतः घेणार, असा धीरवजा शब्द त्याला दिला. यावेळी उपस्थितांनी मोठी घोषणाबाजी केली.उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, आतापर्यंत भाजपवर मोदी व शहांची पोलादी पकड होती. पण आता त्यांची सर्वत्र छी - थू होत आहे. त्यांचे अनेक नेते आता या दोघांचे काहीही चालत नाही म्हणून भाजप सोडून जात आहेत. सर्वजण आमच्या हातातील मशालीच्या प्रकाशात येत आहेत. आमच्याकडे मशालीचा प्रकाश, तर भाजपमध्ये केवळ काळा अंधार पसरला आहे.



## शिक्षक दांपत्याने जोपासली सामाजिक बांधिलकी

# मुलीच्या विवाहानिमित्त शाळा व मंदिर जीर्णोद्धारासाठी केली भरघोस आर्थिक मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर । प्रतिनिधी**

पिंपरी दुमाला ता.शिरूर ( जि.पुणे ) येथील मूळ रहिवासी व सध्या पुणे मनपा मध्ये वडगाव शेरी येथे कार्यरत असलेले शिक्षक विलास चंदर दुर्गे व जि.प.शाळा चाकण रोड शिक्रापूर येथे सेवेत कार्यरत असलेल्या निता विलास दुर्गे या शिक्षक दांपत्याने आपल्या उच्चशिक्षित मुलीच्या विवाहानिमित्त अनावश्यक बाबींना टाळून गावातील जिल्हा परिषद शाळा व ग्रामदैवताच्या मंदिर जीर्णोद्धारासाठी भरघोस आर्थिक मदत केली आहे.



प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण पूर्ण करून प्राथमिक शिक्षक पदावर रुजू झाल्यानंतर आपले गाव व आपली शाळा याविषयी संवेदनशील असलेले आदर्श शिक्षक विलास दुर्गे यांनी याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या. ज्या शाळेने जीवन जगण्यासाठीचे संस्कार दिले व ज्या ग्रामदैवताच्या मंदिर परिसरामध्ये बालपण गेले,त्या दोन्ही संस्थांबाबत मदतीची भावना कायम मनामध्ये होती त्यामुळे पारंपारिक सन्मान सोहळे व इतर सर्व अनावश्यक बाबींना टाळून या ज्ञानमंदिर व ग्राम मंदिराच्या ऋणातून अल्प प्रमाणात ऋणमुक्त होण्यासाठीचा हा प्रयत्न आहे अशी भावना विलास दुर्गे यांनी व्यक्त केली .

जिल्हा परिषद शाळा व सोमेश्वर मंदिर परिसर या दोन्ही ठिकाणी सध्या विकास कामे सुरू आहेत यासाठी दोन्ही संस्थांना मिळून एकूण ५० हजार रुपये मदत देण्यात आली आहे असे प्रगतशील शेतकरी व माजी उपसरपंच अशोक दुर्गे यांनी सांगितले.देवस्थान ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष सुनील सोनवणे,खजिनदार शेखर पाटेकर व शाळेच्या वतीने मुख्याध्यापक राहुल चातुर यांनी हा निधी स्वीकारला.दुर्गे परिवाराने केलेल्या या अनमोल मदतीबद्दल ग्रामपंचायत पिंपरी दुमाला चे सरपंच महेंद्र डोळस, उपसरपंच शरद खळदकर, सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट पदाधिकारी कैलास पिंगळे,अरुण कळसकर,अभिषेक शेळके,श्रीकांत सोनवणे,कैलास बडदे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शशिकांत चिखले, उपाध्यक्ष वर्षाताई विशाल खळदकर यांनी आभार व्यक्त केले आहे.

## ज्येष्ठ,रुग्ण, दिव्यांग घरातून करणार मतदान, केंद्रच पोहोचणार घरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

अपंग,चालता येत नसलेल्या किंवा अंथरुणास खिळून असलेले ज्येष्ठ नागरिक, रुग्ण,दिव्यांगांना आता त्यांच्या घरातूनत मतदान करता येणार आहे. मतदान केंद्रच त्यांच्या घरी येणार आहे. त्यासाठी निवडणूक विभागाने तयारी केली आहे. २३१-आष्टी विधानसभा मतदार संघातील ८५ पेक्षा जास्त वर्षावरील जेष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांचे मतदान सोमवारी दि.११, दि.१२,व दि.१३/११/२०२४ रोजी म्हणजे तीन दिवस सकाळी ०८.०० ते ५.०० या वेळेत मतदान पथकाद्वारे घरी जाऊन मतपत्रिका द्वारे पार पडणार असल्याचे माहिती निवडणूक अधिकारी वसीमा शेख यांनी दिली या मतदारसंघातील ८५ वर्षावरील जेष्ठ नागरीकांचे ६५३ व दिव्यांग मतदार ३३ अशा एकुण ६८६ मतदारांचे मतदान करून घेण्यासाठी निवडणूक विभागामार्फत ५३ टीम तयार केल्या आहेत. त्यामध्ये मतदान अधिकारी एक व दोन, सुक्ष्मनिरीक्षक, पोलीस, व्हिडीओग्राफर, क्षेत्रीय अधिकारी व संबंधित इडज यांचा समावेश असेल. करिता जेष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी त्यादिवशी आपल्या इडज शी संपर्कात राहुन घरी थांबावे व मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन आष्टी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती वसिमा शेख यांनी केले आहे.

# रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन

## मी मतदान करणारच अशी शपथ दिली;सेल्फी पॉइंटची उभारणी केली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हा प्रशासन कक्ष व उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेडच्यावतीने मतदान जनजागृती उपक्रम मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी रांगोळी स्पर्धा आज श्री गुरुगोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड च्या प्रांगणात आयोजित करण्यात आली होती .रांगोळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मतदानाचा टक्का वाढला पाहिजे. सर्व महिलानी मतदान केले पाहिजेत यासाठी रांगोळीमध्ये वेगवेगळे स्लोगनच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात आली . त्याचबरोबर सेल्फी पॉईंट देखील या ठिकाणी उभारण्यात आले होते.



यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत तसेच जिल्हा स्वीप प्रमुख तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी जिल्ह्यातील नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले.या स्पर्धेचे आयोजन प्रकल्प संचालक डॉ .संजय तुबाकले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले .यावेळी स्वीप कक्ष शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ.श्रीमती सविता बिरगे, उमेद जिल्हा अभियान व्यवस्थापक गजानन पातेवार, गणेशसिंह चंदेल, जिल्हा समुपदेशक बालासाहेब कच्छवे ,जिल्हा व्यवस्थापक गणेश कवडेवार, माधव भिसे, तालुका अभियान व्यवस्थापक धम्मपाल ढवळे, गणेश आरोटले, तालुका व्यवस्थापक मल्लेश एडके, इरवंत सूर्यकार, श्रीमती कांता ताटे, प्रभाग समन्वयक श्रीमती वैशाली कोतवाले, निलेश जोंधळे, विनोद लोहोकरे तसेच जिल्हा कौशल्य समन्वयक अतिष गायकवाड, तालुका कौशल्य समन्वयक बालाजी गिरी तसेच लेखापाल हणमंत कंदुरके व उमेद अभियानाचे कर्मचारी तसेच ग्रामीण भागातून आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहातील महिला स्पर्धक सहभागी झाले होते.मी मतदान करणारच अशी शपथ यावेळी घेण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब कच्छवे यांनी केले.

### चारोळी

सुखात सारे सोबती
दु:खात कुठेशी गायब होती
ओळखता यायला हवीत नाती
तरच पेटतील विचारांच्या वाती.

रंजना सानप
मायणी (सातारा)



दि.९ नोव्हेंबर शनिवार रोजी नांदेड येथील विजय निर्धार सभेत देशाचे पंतप्रधान मा.ना.श्री. नरेंद्र मोदीजी साहेब यांच्या समवेत चर्चा करताना लोक कल्याणकारी नेतृत्व श्री मारोतराव व्यंकटराव पाटील कवळे गुरुजी नांदेड

# पुरस्काराने सन्मानित होणे म्हणजे जबाबदारीत वाढ होणे : कवी प्रा.वा.ना.आंधळे

## मराठी लाईव्ह न्युज पोर्टलचा पाचवा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अमळनेर । जळगाव**

कर्तृत्व हे सिद्धीप्रमाणे असते.जेवढी साधना अथक व निरपेक्ष असेल तेवढी सिद्धी साधकास तेजोमयी करते.आणि कर्तृत्वान सर्वश्रुत होत जातो.पुढे चालून कर्तृत्व ही ओळख बनून समाजाकडून यथोचित गौरविली जाते.होणारा हा गौरव त्या व्यक्तिच्या जबाबदारीत वाढ करणारा असतो.थोडक्यात पुरस्कार म्हणजे जबाबदारीत होणारी वाढ.



असे सूतोवाच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी उपस्थित जनसमुदायासमोर केले.अमळनेर येथील मराठी न्युज पोर्टलच्या पाचव्या वर्धापन दिनाचे आयोजन व दहा कर्तृत्वान महानुभावांचा कर्तृत्व गौरव पुरस्कार सोहळा दि.६नोव्हेम्बर २०२४ रोजी टाऊन हॉल येथे पोर्टलचे संपादक श्री.ईश्वर महाजन आणि मंगळ ग्रह मंदिर समिती अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी समाजातील विविध क्षेत्रात दैदीप्यमान कार्य करणाऱ्या महानुभवांचा सन्मान चिन्ह, प्रशस्ती पत्र,शॉल,व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.त्याप्रसंगी प्रा.आंधळे यांनी आपले विचार मांडलेत.

ते आपल्या मनोगतात पुढे म्हणाले की,आपल्या देशात कर्तृत्वाचा आणि कर्तृत्ववानांचा वारसा खूप मोठा असून तो वसा म्हणून जपणारे महानुभाव आपल्या चौफेर प्रेरणा स्रोत म्हणून समाजाच्या हृदयस्थ झालेले दिसून येतात.हा मुद्दा विशद करतांना प्रा.आंधळे यांनी संतश्रेष्ठ ज्ञानदेव तुकोबारायांपासून छत्रपती शिवाजी महाराज,अब्राहम लिंकन,महामहिम माजी राष्ट्रपती भारत रत्न ए पी जे अब्दुल कलाम,पद्मश्री पद्म विभूषण रतन टाटा यांच्या कर्तृत्वाचा पट थोडक्यात मांडला.

पत्रकार आणि पत्रकारिता ही समाजहितासाठीच जन्माला आली असून तिची मुहूर्तमेढ महाराष्ट्रप्रांती बाळ शास्त्री जांभेकरांनी केल्याचे नमूद करीत लोकशाहीसाठी पत्रकारिता श्वासाईतकी महत्वाची असल्याचे स्पष्टीकरण दिले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी मंगळ ग्रह मंदिर अमळनेर ट्रस्टचे अध्यक्ष मा.डॉ.डिगम्बर महाले यांची उपस्थिती होती.व्यासपीठावर नोबेल फाउंडेशन जळगावचे अध्यक्ष सुप्रसिद्ध वक्ते डॉ.जयदीप पाटील,प्रताप महाविद्यालयाचे निवृत्त उपप्राचार्य डॉ.एस.ओ.माळी,आदिवासी विकास महामंडळ नाशिकचे उपयुक्त मा.श्री. कपील पवार,सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी मा.श्री. सुनील नंदवाळकर, देवगाव देवळी हायस्कूलचे अध्यक्ष मा.श्री. विलासराव पाटील,मराठी वाङ्मय मंडळाचे उपाध्यक्ष मा.श्री. श्यामकांत भदाणे,तसेच मराठी लाईव्ह न्युज चे संपादक मा.श्री.ईश्वर महाजन सर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक ईश्वर महाजन यांनी केले.याप्रसंगी सर्व अतिथी मान्यवरांसह सत्कारार्थी यांची मनोगते संपन्न झालीत.

समारंभाचे अध्यक्ष डॉ.डिगंबर महाले यांनी डिजिटल पत्रकारितेचे महत्व विशद करीत वर्तमानासोबत गतिमान राहण्यासाठी डिजिटल पत्रकारिता किती महत्व राखते असे स्पष्ट करीत ईश्वर महाजन यांच्या कष्टमय जिद्दीचे मनमुराद कौतुक केले.

सदर समारंभास अमळनेर शहरातील तसेच पंचक्रोशीतील प्रतिष्ठित सुजाण श्रोते बंधू भगिनी यांची भरगच्च उपस्थिती होती.संपूर्ण कार्यक्रमाचे श्रवणीय सूत्र संचलन व आभार प्रदर्शन मा.सौ.वसुंधराताई लांडगे मॅडम यांनी केले.

## संपादकीय..

# कौल कोणाला

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाआघाडी विरुद्ध महायुती या अटीतटीच्या लढाईत सहा प्रमुख नेत्यांची खऱ्या अर्थाने परीक्षा आहे. सन २०१९ पर्यंत भाजपा-शिवसेना युती विरुद्ध काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस महाआघाडी अशी लढत होत होती. गेल्या पाच वर्षांत राज्यात झालेली सत्तांतरे आणि दोन प्रमुख प्रादेशिक पक्षांत झालेली बंडखोरी यातून राजकीय समीकरणे बदलली आहेत. महायुतीला एक नेता नाही आणि महाआघाडीला सुद्धा सर्वमान्य नेता नाही. उद्धव ठाकरे हे माजी मुख्यमंत्री असले तरी ते महाआघाडीचे नंबर १ चे नेते म्हणून ओळखले जात नाहीत आणि एकनाथ शिंदे हे महायुतीचे मुख्यमंत्री असले तरी निवडणुकीनंतर तेच मुख्यमंत्री असतील असे भाजपा किंवा अजित पवार गट सांगायला तयार नाही. म्हणूनच शरद पवार, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, नाना पटोले या सर्वच नेत्यांची या निवडणुकीत मोठी परीक्षा आहे. मुस्लीम व्होट बँक ज्यांचा मोठा आधार बनली आहे, त्या उबाठा सेनेचे भवितव्य यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर ठरणार आहे.

यंदा २०२४ ची राज्य विधानसभा निवडणूक खरोखरच अभूतपूर्व आहे. रस्त्यांवर पिंजऱ्यात बसलेल्या पोपटालाही बाहेर येऊन कोणता पक्ष सरकार बनवणार याचे कार्ड शोधणे अवघड आहे. कुडमुडे ज्योतिषी आणि मतदारांचा निवडणूकपूर्व व मतदानोत्तर कौल घेणाऱ्या वृत्तवाहिन्यांनीही यंदाच्या निवडणुकीत ताकही फुंकून प्यावे लागणार आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकारणाने सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री आणि सर्व प्रमुख पक्षांना सत्ता उपभोगण्याची संधी या राज्यात मिळाली. ठाकरे यांच्या पक्षाचे ४० आणि शरद पवारांच्या पक्षाचे ४० अशा ८० आमदारांनी पक्ष नेतृत्वाला आव्हान दिले व पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह काबीज केले, असे महाराष्ट्रात प्रथमच घडले. मराठीच्या अस्मितेचा अभिमान बाळगणारे उबाठा सेना, शिवसेना (शिंदे), मनसे हे तीनही पक्ष मैदानात आहेत. ठाकरेंच्या पक्षातून बाहेर पडलेले नेते उबाठा सेनेवर तुटून पडत आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन तुकडे झाल्यापासून काका विरुद्ध पुतण्या असा जंगी सामना रोज बघायला मिळत आहे. यंदाच्या निवडणुकीला सर्वपक्षीय कुटुंबशाहीचा विळखा पडला असला तरी मतदारांनीच ही व्यवस्था स्वीकारली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाप्रमाणेच विधानसभेला मतदार कौल देतील काय, हा मोठा कळीचा मुद्दा आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात महायुतीची सत्ता यायलाच हवी, यासाठी देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांनी चंग बांधला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचेही राज्यात मोठे दौरे होणार आहेत. देशाची आर्थिक राजधानी मुंबई ज्या राज्यात आहे, त्या राज्याची सत्ता वाट्टेल ते करून आपल्याच हाती राहिली पाहिजे यासाठी भाजपाने सर्वस्व पणाला लावले आहे. राज्याचा मुख्यमंत्री मित्रपक्षाचा असला तरी त्याचा रिमोट कंट्रोल हा भाजपाच्या हाती असतो, हे जनतेलाही पूर्ण ठाऊक आहे. महाआघाडी व महायुतीतील मित्रपक्षांमध्ये स्पर्धा आहेच. आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आले तरच आपल्याला महत्त्व मिळते, हे त्यांच्या नेत्यांना चांगले ठाऊक आहेत. आमदारांच्या संख्याबळावरच नेत्यांची पत आणि प्रतिष्ठा मोजली जाणार आहे. आमदारांचे संख्याबळ असेल, तरच सौदेबाजी करता येते. म्हणूनच सहा पक्षांच्या सहा नेत्यांची विधानसभा निवडणुकीत कठोर परीक्षा आहे.एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरोधात बंड करण्याची हिम्मत दाखवली. शिवसेनेतून एकाच वेळी ४० आमदार, १३ खासदार बाहेर पडल्यावर महाराष्ट्रात राजकीय भूकंप झाला. ठाकरेंना मुख्यमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागलेच आणि महाआघाडीचे सरकारही कोसळले. त्याचे बक्षीस म्हणून भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले. शिंदे हे भाजपाचे बाहुले मुख्यमंत्री असतील. महाराष्ट्राच्या सर्वोच्च पदावर बसल्यावर 'भाजपा बोले व शिंदे डोले' असे वागतील असे अनेकांना वाटत होते. पण शिंदे यांनी आपल्या कामाने स्वत:ची तडफदार मुख्यमंत्री म्हणून प्रतिमा निर्माण केली. आपल्या कामगिरीने त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास संपादन केला. अहोरात्र काम करणारा कार्यक्षम मुख्यमंत्री अशी त्यांची ओळख झाली. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने १५ जागा लढवल्या व ७ जिंकल्या. उबाठा सेनेपेक्षा शिंदेंच्या शिवसेनेचा स्ट्राइक रेट सरस ठरला. शिंदे यांची शिवसेना विधानसभेच्या ८० जागा लढवत आहे. ज्यांनी बंडाला साथ दिली त्या सर्वांना शिंदे यांना निवडून आणायचे आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित चांगले यश मिळाले, तर शिंदे राज्याच्या सिंहासनावर पुन्हा बसू शकतील. भाजपा श्रेष्ठींनी त्यांच्यातील नेतृत्व गुणवत्ता, कामाची तडफ हेरली आहे. उद्धव व आदित्य यांच्या नावामागे ठाकरे आडनाव आहे. शिंदे हे स्वत:च्या कर्तृत्वाने नेते झाले आहेत. सतत सक्रिय राहून व संघर्ष करून त्यांना झगडावे लागले आहे. निकालानंतर ते स्वत: किंग होतील किंवा किंग मेकर म्हणून त्यांना भूमिका बजवावी लागेल. शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या गटाला दिले आहे. विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यावर शिक्कामोर्तब करणे आवश्यक आहे. यंदाची निवडणूक ही ठाकरे विरुद्ध शिंदे आणि शिवसेना विरुद्ध उबाठा सेना अशी आहे. शिंदे यांना शिवसेना आपलीच आहे हे सिद्ध करून दाखवावे लागेल. भाजपाकडे अजित पवार व राज ठाकरे (महायुतीच्या बाहेरील) हे आणखी दोन मित्र आहेत, याचे भान ठेऊन शिंदे यांना राजकारण खेळावे लागणार आहे.पाच वर्षे मुख्यमंत्रीपदावर राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना २०१९च्या निवडणुकीनंतरच्या पाच वर्षांत मुख्यमंत्री (८०) तास, विरोधी पक्षनेता व उपमुख्यमंत्री अशा तीनही भूमिका पार पाडव्या लागल्या. आजही देवेंद्र हेच महाराष्ट्राचा भाजपाचा चेहरा आहेत. तेच भाजपाचे राज्यात नंबर १ चे नेते आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाने महाराष्ट्रात २८ जागा लढवल्या पण केवळ ९ जागांवर विजय मिळाला. केंद्रात व राज्यात भाजपा सत्तवेर असूनही राज्यात भाजपाला नामुष्की पत्करावी लागली. लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या खराब कामगिरीनंतर स्वत: देवेंद्र यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली. आपण पक्षासाठी काम करू असे त्यांनी म्हटले होते.पण श्रेष्ठींनी उपमुख्यमंत्री पदावर राहा असे सांगून पक्षाची महाराष्ट्राची सूत्रे त्यांच्याकडे सोपवली. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही, असे स्वत: फडणवीस यांनी म्हटले आहे. मराठा आणि ओबीसी अशी भाजपाला मोठी कसरत करावी लागत आहे. फडणवीस हे नागपूरचे आहेत. पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यातील ते सेतू आहेत. यंदाच्या विधानसभा निवडणूक प्रचारात यावेळी संघ परिवार सक्रिय आहे. भाजपा जवळपास दीडशे जागा लढवत असून शंभरपेक्षा जास्त आमदार निवडून आणणे हे पक्षाचे लक्ष्य आहे. भाजपाचे सर्वाधिक आमदार असूनही गेली पाच वर्षे मुख्यमंत्रीपद फडणवीसांना हुलकावणी देत आहे. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यात वर्चस्वाचे द्वंद्व चालू आहेच. यंदाच्या निवडणुकीत काही चमत्कार घडू शकेल का?गेली सहा दशके महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडीवर असलेल्या ८४ वर्षे वयाच्या शरद पवार यांच्या दृष्टीने यंदाची निवडणूक मोठी आव्हानात्मक आहे. पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदावर बसविण्यात आणि भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यात पवारांची कौशल्यपूर्ण रणनिती व मुत्सद्देगिरी कारणीभूत होती. महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्यात पवार यांचाच पुढाकार होता. भाजपाकडून दुखावलेल्या उद्धव ठाकरेंना महाआघाडीच्या तंबूत खेचण्यामागे पवार यांचाच आराखडा होता. आता महाविकास आघाडीचे सरकार हटविण्यासाठी पवार जिद्दीने मैदानात उतरले आहेत. आपल्या स्वत:च्या पक्षात झालेले बंड मोडून काढणे पवारांना जमले नाही, पण मतदारांसमोर जाऊन आपण स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हाच खरा पक्ष आहे हे सिद्ध करण्याचे आणखी मोठे आवाहन पवारांसमोर आहे. लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ काकांनी जिंकून दाखवला. तिथे सुनेत्रा पवारांचा पराभव करून सुप्रिया सुळे विजयी झाल्या. आता विधानसभा निवडणुकीत घरातलेच उमेदवार पुन्हा तोच खेळ खेळत आहेत. लोकसभा निवडणुकीत पवारांच्या पक्षाने १० जागा लढवल्या व ८ जिंकल्या. विधानसभेसाठी त्यांचा पक्ष ८७ जागा लढवत आहे. पक्षाच्या प्रचारासाठी ते दिवस-रात्र वणवण करीत आहेत. उपमुख्यमंत्री असलेल्या पुतण्याशी बारामतीत आपल्याच होम ग्राऊंडवर थेट लढा देण्याची वेळ काकांवर आली आहे.

# पंजाबचे वाळवंट?

'ग्रेन बाऊल' म्हणून ओळखला जाणारा पंजाब भारतीय शेतीचा आधारस्तंभ आहे. तिथली सुपीक माती आणि समर्पित शेतकरी दरवर्षी लाखो टन धान्याचे उत्पादन करतात. जे भारताच्या अन्न गरजा पूर्ण करतातच; पण निर्यातीतही योगदान देतात. असे असले तरी हवामानबदल, पाण्याचा अतिवापर आणि जमीन वापरातील बदल यांसारख्या घटकांमुळे पंजाबच्या शेतजमिनीला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता समोर आली आहे. शेतीमध्ये उच्च उत्पादन मिळवण्यासाठी पंजाबमध्ये नायट्रोजन, फॉस्फेट आणि पोटॅश यासारख्या खतांचा सर्वाधिक वापर केला जातो. केंद्रीय रसायन आणि खते मंत्रालयाने ६ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, पंजाबने २०२३-२४ मध्ये प्रति हेक्टर २४७.६१ किलो खताचा वापर केला. हे प्रमाण राष्ट्रीय सरासरी १३९.८१ किलो प्रति हेक्टरच्या जवळपास दुप्पट आहे. पंजाबमध्ये भारतातील केवळ १.५३ टक्के कृषी क्षेत्र असले, तरी देशात वापरल्या जाणाऱ्या एकूण खतांपैकी नऊ टक्के खतांचा वापर होतो. आकडेवारीनुसार, एनपीके नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम खतांचा वापर गेल्या चार दशकांमध्ये १९८०-२०१८, १८० टक्क्यांनी वाढला आहे. याच चार दशकांमध्ये एकट्या पंजाबमध्ये युरिया (नायट्रोजन)चा वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. त्याच अहवालानुसार भात आणि गव्हासाठी युरियाचा वापर अनुक्रमे ०.९ क्विंटल आणि १.१ क्विंटल प्रति एकर (०.४ हेक्टर) असावा; परंतु येथील शेतकरी साधारणपणे यापेक्षा ०.४-०.६ क्विंटल अधिक वापरतात. १९८० ते २०१८ दरम्यान राज्यात खतांच्या वापरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याउलट या काळात धानाच्या उत्पादनात केवळ ६८ टक्के तर गव्हाच्या उत्पादनात ८५ टक्के वाढ झाली आहे. याशिवाय भूजल पातळीतही सातत्याने घट होत असल्याने शेतकऱ्यांना पाण्यासाठी ५०० फुटांपर्यंत कूपनलिका खोदावी लागत आहे. हरित क्रांतीने भारताला अन्न उत्पादनात स्वयंपूर्णतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यास मदत केली; परंतु त्याचे कृषी आणि पर्यावरणावर गंभीर दुष्परिणाम झाले. या क्रांतीचा सर्वात मोठा परिणाम पंजाबमध्ये दिसून येत आहे.



पंजाबमध्ये पहिल्यापासूनच भात आणि गव्हाच्या लागवडीला प्राधान्य दिले गेले. या एकतर्फी दृष्टिकोनामुळे शेतकरी या पिकांवर जास्त अवलंबून आहेत, परिणामी कृषी विविधता कमी झाली आहे. याव्यतिरिक्त, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका आहे. पंजाबमध्ये पूर्वी मका, बाजरी, ज्वारी, कडधान्ये, तेलबिया आणि भाजीपाला तसेच दुग्धजन्य पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत होते. यामुळे शेतकरी कुटुंबांना स्थिर उत्पन्न आणि संतुलित अन्न उपलब्ध झाले. या बहुआयामी शेतीव्यवस्थेने शेतकऱ्यांना स्वावलंबी ठेवले. त्यामुळे ते बाजारपेठेवर कमी अवलंबून राहिले. १९८० च्या दशकापूर्वी, शेतकरी काडेपेटी, मीठ आणि मसाले यांसारख्या छोट्या वस्तू बाजारातून विकत घेत असत, कारण ते त्यांच्या शेतीतून इतर सर्व गरजा भागवत. त्या काळात शेतीमुळे जमिनीची सुपीकता तर राहिलीच; शिवाय शेतकरी कुटुंबांचे आरोग्यही राखले गेले, म्हणूनच जास्त भात आणि गहू पिकवल्याने पंजाबची शेती वाळवंटात बदलत आहे का, असा प्रश्न आता उत्पन्न होत आहे. पंजाबच्या शेतांना वाळवंटात बदलण्यात भात आणि गव्हाच्या अतिशेतीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अधिकृत अहवालांनुसार, जास्त निचरा, जमिनीची गुणवत्ता ढासळणे आणि रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे येथील जमिनीची सुपीकता कमी झाली आहे.पंजाब कृषी विभागाच्या अहवालात हे स्पष्ट करण्यात आले आहे की, हवामानबदल आणि अस्थिर मॉन्सूनमुळे जलसंकट अधिक गडद होत आहे. त्यामुळे शेतजमिनीच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. दीर्घकालीन मोनोक्रॉपिंग पद्धतींमुळे मातीची विविधता नाहीशी झाली असून, जलस्रोतांवर दबाव वाढला आहे. या परिस्थितीमुळे योग्य उपाययोजना न केल्यास पंजाबमधील शेतीची जमीन एक दिवस अक्षरशः वाळवंटी भागात बदलू शकते. देशासाठी अन्नधान्य निर्माण करणाऱ्या पंजाबचे वाळवंट होण्यामागे काही कारणे आहेत. एकाच पिकाची जसे भात आणि गहू सतत वाढ केल्याने जमिनीतील पोषक तत्त्वांची विविधता कमी होते. त्यामुळे जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो. या पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर वाढवला आहे. रासायनिक खतांचा दीर्घकाळ वापर केल्याने जमिनीतील संतुलन बिघडते आणि नैसर्गिक सुपीकता कमी होते. भातशेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. यामुळे भूजल पातळी कमी होते आणि पाण्याचे संकट निर्माण होते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. सतत पीक घेतल्याने मातीचे धूप वाढते. त्यामुळे त्याची रचना आणि पोषण कमी होते. पीक विविधतेच्या अभावामुळे कीड आणि रोगांचा दबाव वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक कीटकनाशके वापरण्यास भाग पाडले जाते. त्याचा परिणाम माती आणि पाण्याच्या स्त्रोतांवरही होतो.वस्तुत: शेतकऱ्यांना धान आणि गव्हाऐवजी डाळी, तेलबिया किंवा फळे आणि भाजीपाला यांसारखी इतर पिके घेण्यास प्रवृत्त केल्यास जमिनीची सुपीकता वाढेल आणि फायदेही मिळतील. जमिनीच्या गुणवत्तेनुसार खतांची निवड करून समतोल वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना जागरूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर करण्यावर भर दिल्यास भूजल पातळीत सुधारणा होईल. सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब केल्यास जमिनीची सुपीकता राखण्यात मदत होऊ शकते. शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान आणि पद्धतींबद्दल शिक्षित करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. आकडेवारीनुसार, गेल्या चार दशकांमध्ये (१९८०- २०१८ दरम्यान) एनपीके खतांचा वापर १८० टक्क्यांनी वाढला आहे. त्याच वेळी, १९८० ते २०१८ या काळात केवळ युरियाचा (नायट्रोजन) वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. येथे शेतात खतांचा अतिवापर होणे हे आता गुपित राहिलेले नाही. शेतकरी खतांचा वापर एका रात्रीत कमी करू शकत नाहीत. ही प्रक्रिया वर्षानुवर्षे संथपणे चालत असावी, अन्यथा उत्पादनात मोठी घट होईल. यानंतर कीटकनाशकांचा क्रमांक येतो. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रानंतर पंजाब हे रासायनिक कीटकनाशकांचा देशातील तिसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. खतांसोबतच कीटकनाशकांचा वापरही वाढतो. खतांच्या अतिवापरामुळे वनस्पतीवृद्धी वाढते. म्हणजेच पीक गडद हिरवे होते. त्यामुळे कीटकांचे आक्रमण आणि रोग अधिक आकर्षित होतात. पानातील द्रवपदार्थ हे कीटकांचे अन्न आहे. पान जितके जाड असेल, तितके कीटक आणि कृमींचे अन्न जास्त असते. बर्नाला जिल्ह्यात वसलेले पट्टी खट्टर हे गाव सतलज नदीच्या दक्षिणेस पंजाबच्या माळवा भागात आहे. 'सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड'च्या मूल्यांकनानुसार, येथील बहुतांश ब्लॉक्स 'डार्क' झोनमध्ये येतात. ते भूजलाच्या अति-शोषणाची पातळी दर्शवतात. तांदळामुळे पंजाबचे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्याचे वाळवंटात रूपांतर होत आहे. पंजाबमध्ये १४ लाख कूपनलिका भातपिकाच्या हंगामात आठ तास चालतात. एक हेक्टर जमिनीवर एक इंच पाणी म्हणजे एक लाख लिटर. पंजाबमध्ये भाताच्या हंगामात किमान ४-५ इंच पाणी साचत राहते. दर वर्षी राज्यातील पाण्याची पातळी ३-५ फुटांनी घसरते. भूजल पातळी कमी होण्याचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय समितीने २०२१ मध्ये भूजल उत्खननाची सध्याची प्रवृत्ती कायम राहिल्यास पुढील २५ वर्षांमध्ये राज्य वाळवंटात बदलेल, असा अंदाज वर्तवला आहे. वाढत्या लोकसंख्येला पोसण्याच्या गरजेने भारतात हरितक्रांतीची सुरुवात झाली आणि त्यासोबतच तांदूळ, गहू पीक प्रणाली आली. तिथे एकाच जमिनीवर वारंवार ही पिके घेतली जातात. १९६० पासून सादर केलेल्या उच्च-उत्पादक वाणांनी भारताला अन्न सुरक्षा प्राप्त करण्यास मदत केली आणि ती राखण्यात मोठी भूमिका बजावली. अनुदानित खतांमुळे याला आणखी चालना मिळाली आणि पंजाब हा देशातील सर्वाधिक लागवडीचा प्रदेश बनला.यामुळे शेतीतील भूस्सा जाळण्याचे प्रमाण वाढले. परिणामी, मातीतील सूक्ष्मजीव क्रियाकलाप बिघडला आणि जमिनीतील मायकोरिझा (एक प्रकारची बुरशी) नष्ट झाली. मातीमध्ये मायकोरिझाईची भूमिका वनस्पतींच्या मुळांना अधिक पोषक द्रव्ये शोषण्यास मदत करते. पंजाब आणि हरियाणामध्ये दर वर्षी ऑक्टोबरचा उत्तरार्ध ते नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत भाताचे कापणीनंतरचे अवशेष जाळण्याचे प्रमाण व्यापक आहे, कारण शेतकऱ्यांना १०-१५ दिवसांच्या कालावधीत भात कापणी आणि गहू पेरणे आवश्यक असते. मायकोरायझी नायट्रोजनचे अमोनियममध्ये रूपांतर करतात, जे झाडे शोषून घेतात आणि वापरू शकतात. २०२२ मध्ये पंजाब कृषी विद्यापीठाने मातीचाचणी केली तेव्हा जमिनीत पोटॅशचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. ही समस्या खूप गंभीर आहे. अशा अनेक समस्यांवर मात करण्याचे आव्हान पंजाबपुढे आहे आणि ते कौशल्याने पेलावे लागणार आहे.

# विकासकामे बोलकी ठरणार?

लोकसभा निवडणुकांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीला मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या अर्ध्या टक्क्यांचा फरक आहे. लाडकी बहीण योजनेमुळे महायुती सरकार महिला मतदारांना जिंकू शकेल. खेरीज सोयाबीन, तांदूळ, धान आदी पिकांचे राहिलेले पैसे दिले गेले आहेत. मुंबई-पुण्यामध्ये मेट्रो जाळे विस्तारणे, कोस्टल रोड, अटल सेतू, टोल हटवले जाणे आदी निर्णयांमुळे ही निवडणूक महायुती आपल्या बाजूने झुकवू शकेल. महाराष्ट्रात निवडणुकीचे रण चांगलेच तापले आहेत. एव्हाना सर्व पक्षांचे उमेदवार निश्चित होत आले आहेत. लवकरच प्रचाराची जोरदार रणधुमाळी अनुभवायला मिळेल. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी फडणवीस आणि अजित पवार यांच्या सरकारचा शपथविधी झाला होता आणि त्याच दिवसापासून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक घटनांची मालिका सुरू झाली होती, जी आजपावेतो सुरूच आहे. भाजपाबरोबर युती करुन निवडणूक लढवणारी शिवसेना निकालानंतर ताबडतोब शरद पवार आणि काँग्रेसबरोबर गेली आणि महाविकास आघाडी स्थापन झाली. त्यावेळी शिवसेनेचे ५६ आमदार होते तर शरद पवारांचे ५४ होते. दोन आमदार जास्त असल्याच्या बळावर उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपद मिळाले. राज्यातील मोठा, अधिक मतदार असणारा पक्ष असूनही काँग्रेसला केवळ ४४ जागा मिळाल्या. भाजपाकडे १०५ आमदार होते. मात्र सगळ्यात मोठा पक्ष असूनही तो विरोधात बसला, ही देखील क्वचितच बघायला मिळणारी बाब त्यावेळी दिसून आली. पुढे कोरोनामुळे हे सरकार नीट चालू शकले नाही. जवळपास दीड वर्ष त्यातच गेले. त्या काळी विधानसभेचे कोणतेही अधिवेशन आठवड्यापेक्षा अधिक काळ चालले नाही. स्वाभाविकच राजकारणात एक खदखद जाणवत होती. परिणामी हे सरकार गडगडले. उद्धव ठाकरेंच्या कार्यकाळात पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराखाली कथित बाँब ठेवण्याचे धाडस केल्याची घटना गाजली. तिने धक्कादायक वा भूकंप घडवून आणणाऱ्या घटनांच्या मालिकेत भर घातली. पुढे गाडीचा मालक मृतावस्थेत आढळला आणि प्रकरण चिघळले. हा खटला अद्यापही सुरू झालेला नाही. दीड-दोन वर्षांनंतर अनिल देशमुख तुरुंगाबाहेर आले. दरम्यान, नबाब मलिक अडचणीत आल्याचे आपण पाहिले. त्यापाठोपाठ संजय राठोड अडचणीत आले. थोडक्यात, उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील बरेच मंत्री अडचणीत येत होते आणि भाजपाला मोठा फायदा मिळत होता. सरकारकडे नसणारी माहिती आधी फडणवीसांकडे येत होती. त्यामुळे सरकार अस्थिर अवस्थेत होते. नंतरच्या राज्यसभेच्या निवडणुकीतही शिवसेनेला मोठा फटका बसला आणि पुढील दहाच दिवसांत झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर सरकार कोसळले. त्यानंतर जूनच्या अखेरीस एकनाथ शिंदेंचे सरकार आले पण ते वैध की अवैध यावर प्रश्नचिन्ह होते. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात जाऊनही कोणताही निकाल लागलेला नाही. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस फुटली आणि पक्षाचा मोठा घटक अजित पवारांच्या नेतृत्वाखाली बाहेर येऊन महायुती सरकारमध्ये सामील झाला.

वेगवान प्रशासनाची चुणूक दाखवताना महायुती सरकारने अनेक महत्वाचे निर्णय घेतले. थांबलेली प्रकरणे, अडलेले प्रकल्प मार्गी लागले. असे असले तरी या सरकारला शेतकरी वर्गाची नाराजी दूर करता आली नाही. मराठा समाज आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आक्रमक झाला. मनोज जरांगेंच्या आंदोलनाने या प्रश्नाला मोठी गती आणि वेगळा आयाम दिला. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळू शकते, कुणबी असल्यामुळे त्यांना कुणबी दाखले द्या, ही मोठे सामाजिक अभिसरण घडवून आणणारी मागणी त्यांनी केली. या घुसळणीतून अमृत न निघता जातीयवादाचे विष मात्र निघाले. सरकारने हे आंदोलन शांत करण्याचे प्रयत्न केले आणि जरांगेंना मर्यादेपलीकडे जाऊन आश्वासने दिली. ती पूर्ण करणे शक्य नव्हते. पण लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न साध्य केला गेला. २०२४ च्या लोकसभा निकालामध्ये या सगळ्यांचा मोठा फटका भाजपा आणि मित्रपक्षांना बसला. या सगळ्या स्फोटक पार्श्वभूमीवर येऊ घातलेली निवडणूकही अतिशय गुंतागुतीची आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. महाराष्ट्राचे दोन मोठे पक्ष फुटले आहेत. आधी शिवसेनेची १६-१७ टक्के आणि राष्ट्रवादीचीही मतांची टक्केवारी साधारण तेवढीच होती. शरद पवारांनाही महाराष्ट्रात कधीही ६० पेक्षा जास्त जागा मिळाल्या नाहीत, तर शिवसेनेला ७० जागांपुढे जाता आलेले नाही. म्हणजेच १०० पेक्षा जास्त जागा न मिळाल्याने कधीही स्वबळावर त्यांचे सरकार आलेले नाही.

आज भाजपाची स्वत:ची मतेही फार कमी झालेली नाहीत. मात्र शरद पवार, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना या निवडणुकीत मोठा फटका बसणार आहे. लोकसभेला ठाकरे आणि शरद पवारांना एकमेकांची मदत झाली. दोघांकडील पेटून उठलेल्या कार्यकर्त्यांनी चांगला हात दिला. पण तशी मदत विधानसभेला मिळणार नाही, कारण ही लढत २८८ मतदारसंघांमध्ये होत आहे. त्यामुळेच ४८ मतदारसघांमध्ये एकत्र आलेली ताकद विखुरलेली दिसेल. विधानसभा निवडणुकांच्या परिप्रेक्ष्यातून लोकसभेच्या निकालाचे विश्लेषण केले तर काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष दिसतो. त्यानंतर भाजपाची वर्णी आहे. पण शरद पवार आणि ठाकरेंची परिस्थिती तशी नाही. त्यामुळेच शिवसेनेच्या दोन्ही गटांचा ५०-६० जागांवरच प्रभाव राहील, असे वाटते. थोडक्यात, हा ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांना फटका आहे. त्याचप्रमाणे अजित पवार आणि शरद पवारांनाही फटका बसेल. हे दोन्ही गट एकमेकांची मते खाऊनच मागे पडण्याची चिन्हे आहेत. मतदारसंघामध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्यांनी तेथे लढायचे असे गणित वा मांडणी महायुतीमध्ये असल्यामुळे भाजपाला जास्त मतदारसंघ लढता येतील. साहजिकच तेवढ्या जागा अन्य दोन पक्षांना मिळणार नाहीत.

लोकसभा निवडणुकांमध्ये दोन्ही मोठ्या आघाड्यांना मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या अर्ध्या टक्क्याचा फरक आहे. महायुतीला तेवढीच मते वाढवावी लागतील. लाडकी बहीण योजनेचे सहा हप्ते दिल्यानंतर महिला मतदारांचा झुकता कल हा फरक भरून काढू शकेल. खेरीज सोयाबीन, तांदूळ, धान आदी पिकांचे राहिलेले पैसेही दिले गेले आहेत. त्याचबरोबर अडकलेल्या मोठ्या योजनाही महायुतीतर्फे मार्गी लावल्या गेल्या आहेत. पुण्यामध्ये मेट्रो जाळे विस्तारणे, मुंबईत मेट्रोच्या क्वा लाईनचा एक टप्पा, कोस्टल रोडचा एक भाग, अटल सेतू सुरू होणे, सामान्यजनांसाठी टोल हटवले जाणे हे याचे उदाहरण म्हणावे लागेल. अगदी आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी महायुतीने मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला. थोडक्यात, लोकांच्या हाती पैसे, सेवा पुरवून खूश करण्याचा प्रयत्न महाआघाडीने केला आहे. सात आमदारांची नेमणूक ही आणखी एक महत्त्वपूर्ण घटना म्हणावी लागेल. लाडकी बहीण योजनेमध्ये एकेका विधानसभा मतदारसंघात एक लाखांपेक्षा अधिक महिला समाविष्ट केल्या गेल्या आहेत. त्यातील निम्म्या मतदार महिलांनी पूर्वीचे मतदान बदलून मते फिरवली तरीदेखील मोठा फरक पडेल आणि अडचणीत असणारे मतदारसंघ सूकर होतील असे काही विद्यमान तर काही विरोधी पक्षातील आमदार सांगत आहेत.

# विकासद्रोही,राज्यद्रोही,धर्मद्रोही,जनताद्रोही महाविकास आघाडीच्या नेत्यांना धडा शिकवा-भाजपा गटनेते आ.दरेकर

## काँग्रेसचा लाळघोटेपणा करणाऱ्या ठाकरेंवर रोज आरोपपत्र दाखल करणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ठाणे । प्रतिनिधी**

विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर पहिले पाऊल टाकणाऱ्या महाराष्ट्राला तब्बल दहा वर्षे मागे नेऊन विकासाची वाट रोखणारे महाविकास आघाडी सरकार व नाकर्ते मुख्यमंत्री म्हणून इतिहासात नोंद झालेले उद्धव ठाकरे यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी भाजपाने जंग पुकारला असून महाराष्ट्रद्रोही, विकासद्रोही, शेतकरीविरोधी, महिला व युवकविरोधी, बाळासाहेबांचे हिंदुत्व खुंटीवर टांगून काँग्रेसचा लाळघोटेपणा करणारे धर्मद्रोही ठाकरे यांच्यावर प्रदेश भाजपातर्फे दररोज आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे, असे भाजपाचे विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज पत्रकार परिषदेत जाहीर केले.

भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांची आज ठाणे येथे पत्रकार परिषद पार पडली. यावेळी ते बोलत होते. या पत्रकार परिषदेला भाजपा आमदार निरंजन डावखरे, ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघेला, महिला जिल्हा अध्यक्षा मृणाल पेंडसे, मीडिया सेंटरचे सागर भदे यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत संबोधित करताना आ. प्रविण दरेकर म्हणाले कि, स्वतःचे कोणतेच कर्तृत्व नसणारे, निवडणूकदेखील लढवू न शकणारे उद्धव ठाकरे आपण आग्रह केल्यामुळे मुख्यमंत्री झाले, असा थेट आरोप शरद पवार यांनी केला होता. स्वतः उद्धव ठाकरे यांनीही, बाळासाहेबांचा पुत्र नसतो, तर मला काडीचीही किंमत नाही असे सांगून तशी कबुलीच दिली होती. मुख्यमंत्रीपदासाठी हपापलेल्या ठाकरे यांनी शिवसैनिकास मुख्यमंत्री करण्याऐवजी स्वतःच पदावर बसले आणि आपल्या कृतीचे समर्थन करण्याकरिता शाब्दिक कसरती सुरू केल्या. महाराष्ट्राच्या सुदैवाने त्यांच्या नेतृत्वाखालील भ्रष्ट आघाडीचा सत्ताकाळ अडीच वर्षातच आटोपला अन्यथा महाराष्ट्र लयास गेला असता. सत्तेवर येताच विकासाचे प्रकल्प बंद करणारा पहिला मुख्यमंत्री असेच ठाकरे यांचे वर्णन करावे लागेल. या सत्ताकाळात राज्याच्या हिताचे एखादे तरी दखल घेण्याजोगे काम केल्याचे उद्धव ठाकरे यांनी दाखवून द्यावे, असे आव्हानही यावेळी दरेकरांनी दिले. दरेकर पुढे म्हणाले कि, मुस्लिम लांगूलचालनासाठी वक्फ बोर्ड कायद्याच्या विरोधात दंड थोपटत ज्यांनी आपल्या वडिलांच्या हिंदुत्वाला तिलांजली देऊन दिवाळी साजरी करण्यासही विरोध केला, ते उद्धव ठाकरे महाराष्ट्राच्या जनतेशी कसे प्रामाणिक राहणार? उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने महाराष्ट्राचा विकास रोखला, महामार्ग बांधणे थांबविले, मेट्रो रेल्वेच्या कामास स्थगिती दिली, महाराष्ट्रातील उद्योगांचा मार्ग रोखला, करोना काळात आर्थिक पॅकेज देण्याची घोषणा करूनही संकटग्रस्त जनतेच्या तोंडाला पाने पुसली, कोविड काळात बॉडी बॅग, खिचडी, कोविड सेंटर, औषध खरेदी कंत्राट अशा अनेक घोटाळ्यांना संरक्षण दिले. अशा प्रत्येक घोटाळ्याचा पंचनामा आगामी काळात करण्यात येणार




असून अशा भ्रष्ट नेत्यांना राजकारणातून हद्दपार करण्याच्या महाराष्ट्राच्या जनतेने घेतलेल्या निर्णयास समर्थन देण्यासाठी ठाकरेविरोधी महासंग्रामाचे रणशिंग फुंकण्याचा भाजपचा निर्धार असल्याचे दरेकरांनी यावेळी जाहीर केले. दरेकर पुढे म्हणाले कि, महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना राज्याच्या प्रगतीला खीळ बसली आणि सर्वच क्षेत्रांत राज्याची पीछेहाट झाली. मुंबईतील आरे-कुलाबा मेट्रो प्रकल्पाचे काम निम्म्याहून अधिक पूर्ण झालेले असताना हा प्रकल्प थांबविल्यामुळे मविआ सरकारने राज्याचे १४ हजार कोटींचे नुकसान केल्याचे स्पष्ट झाले, अन्य अनेक जनहिताचे प्रकल्प रोखल्याने शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि गरीब जनता सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहिली. मुंबईचा किनारी मार्ग, अटल सेतू, मेट्रो, नवा विमानतळ, झोपडपट्टी योजना, अशा अनेक सुविधा महायुती सरकारने पुढे राबविल्या आणि बिघडलेला महाराष्ट्राचा मार्ग रुळावर आणला. अडीच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या सरकारने केलेल्या जनहिताच्या आणि राज्यहिताच्या एका तरी कामाचा दाखला द्यावा. ठाकरे सरकारने प्रकल्प रोखले, आणि महायुती सरकारने त्यांना गती दिली.दरेकर म्हणाले कि, सरकारने ठरविले, तर विकासाचे शानदार उपक्रम सरकार राबवू शकते, हे महायुती सरकारने सिद्ध केले आहे. विकासासोबत समाजजीवनाचा स्तर उंचावण्याच्या योजनाही राबविण्याची गरज ओळखून लाडकी बहीण योजना राज्यात सुरू केली, ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकरी अशा अनेक घटकांसाठी महायुती सरकारने आखलेल्या योजनांमुळे राज्याच्या सामाजिक विकासालाही गती मिळाली आहे. पटोले-पवार-ठाकरे यांच्या महाविकास आघाडीने आपल्या सत्ताकाळात अनेक घोषणा केल्या, अनेक आश्वासने दिली. पण त्यापैकी एकही आश्वासन पूर्ण केले नाही, एकही घोषणा अमलात आणली नाही. त्यांच्याच सत्ताकाळात एसटी कर्मचाऱ्यांची परवड झाली, वेतनही न मिळाल्याने १२० कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या, एमपीएससी परीक्षार्थींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांना वाऱ्यावर सोडले. याउलट महायुती सरकारने गेल्या सव्वादोन वर्षांत केलेल्या कामांचा लेखाजोखा प्रगती पुस्तकाद्वारे महाराष्ट्रासमोर मांडला असून सामाजिक, औद्योगिक विकास व पायाभूत सुविधांमुळे राज्याचा बदललेला चेहरामोहरा जनतेसमोर आहे. विधानसभेसाठी महाराष्ट्रात होऊ घातलेली आगामी निवडणूक ही महाराष्ट्राच्या भविष्याची वाटचाल निश्चित करण्यासाठी निर्णायक ठरणार असून राज्याच्या विकासाला स्थगिती देणारे सरकार हवे की प्रगतीला गती देणारे सरकार सत्तेवर हवे याचा निर्णय मतदारांना करायचा आहे. गेल्या पाच वर्षांतील पहिल्या अडीच वर्षांत जनतेने स्थगितीचा अनुभव घेतला व अलीकडच्या अडीच वर्षांत वेगवान प्रगतीचाही अनुभव घेतला. त्यामुळे निर्णय करणे आता सोपे झाले असून महायुतीला कौल देऊन जनता प्रगतीच्या बाजूने मतदान करेल, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

# करमाळा माढा विधान सभा निवडणूक विविध उमेदवारांचा प्रवास सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर । प्रतिनिधी**



करमाळा माढा विधानसभा निवडणूक रंगतदार आणि मोठी लक्षवेधी ठरणार आहे. प्रत्येक उमेदवार रुमाल टाकून जागा धरून ठेवले आहेत. बसस्थानकावर चार फलाट क्रमांकावर चार गाड्या सज्ज झालेल्या आहेत, प्रत्येक गाडी अंतरवली मार्गे मुंबईला जाण्यासाठी तयार आहे. चारही गाड्या चांगल्या कंडिशनमध्ये आहेत.

तालुक्यातील मतदार राजा गाडीच्या बाहेरील बाजूने फिरून अंदाज घेत आहेत की चालक कोण आहे, त्याचा जोडीदार वाहक कोण आहे, कोणती गाडी लवकर पोहोचेल, आणि कोणती गाडी सुखरूप पोहोचवली जाईल. प्रत्येक गाडी जलदगतीने आणि सुखद प्रवास घडवणार असल्याचे कंडक्टर ओरडून सांगत आहेत. चारही चालक आणि वाहक ड्रेसमध्ये दिसत आहेत, आणि चिअर अप आधीपासूनच चालू आहे.

अंतरवलीत गेलेल्या चारही गाड्या निराश होऊन परतलेल्या असल्या तरी जोमाने वेग कमी होऊ द्यायचा नाही, असा मूलमंत्र त्यांच्याकडे आहे. प्रवाशांची चांगलीच त्रेधातिरपीट उडणार हे नक्की, कारण या वेळी त्यांसाठी पर्याय बरेच उपलब्ध आहेत. त्यामुळे सुसाट वेगाने जाणारी गाडीही त्या वेळी स्लो चालणार आहे. हिरवा कंदील अथवा झेंडा दाखवला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. या विधानसभा निवडणुकीत नक्की कोणाचा कोणाला फायदा आणि कोणाचा कोणाला तोटा, हे गूढ आहे. सध्या तरी जेऊर मुंबई ही गाडी अकलूज मार्गे सुसाट वेगाने जाणार असल्याचे चित्र दिसत असले तरी निमगाव मुंबईही तेवढ्याच वेगाने धावताना दिसत आहे. वाशिंबे मुंबईही वेगाने जाणारी नवी कोरी गाडी अनुभवी वाहकाने बऱ्याच प्रवाशांनी भरलेली दिसते. या दोन्ही गाड्या गाडीची वाट पाहत हळूहळू अंतर जवळ कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. शेवटच्या टप्प्यात, लेट पण थेट मांगी ते मुबई ही मिनीबस देखील दबक्या पावलांनी वेग घेणार असल्याचे चित्र निर्माण होऊ शकते. कारण या गाड्यांचा वेग जरी चालक ठरवणार असला तरी दिशा मात्र वाहकावर अवलंबून असणार आहे.अंतिमतः काळ जो येणाऱ्या नाजूक पंधरा दिवसांचा साक्षीदार असणार आहे. त्यावर सर्वांची तारेवरची कसरत होणार आहे, आणि त्यातून जनतेशी प्रामाणिक राहणाऱ्याचं मतदार नेतृत्व मान्य करणार हे मात्र नक्की.

# करमाळा तालुक्यात सर्वांगीण विकासासाठी अपक्ष निवडणूक लढवणार-प्रा.रामदास झोळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज यासोबतच शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि उद्योग निर्मितीसाठी आपण अपक्ष निवडणूक लढवणार असल्याची घोषणा प्रा. रामदास झोळ यांनी करमाळा येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

या पत्रकार परिषदेत शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ आण्णा कांबळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ मंगवडे, उद्योजक प्रशांत बागल, शिवसेना अध्यक्ष संतोष बागल आणि इतर मान्यवर उपस्थित होते. प्रा. रामदास झोळ सर म्हणाले की, करमाळा



तालुक्यातील विकासासाठी आपल्याला सर्वसामान्य जनतेच्या समर्थनाची आवश्यकता आहे. तसेच, करमाळा विधानसभा निवडणूक मतदार संघाच्या उमेदवार निश्चितीच्या प्रक्रियेनंतर प्रा. रामदास झोळ यांचे नाव समोर आले आहे. या संदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी देखील आढावा घेतल्यानंतर प्रा. झोळ यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. प्रा. झोळ यांनी गेल्या ३-४ वर्षांमध्ये करमाळा तालुक्यात विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवले आहेत. त्यात पाण्याचे टँकर, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण आणि मॅरेथॉन स्पर्धांचा समावेश आहे. त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या चळवळीत सक्रिय भूमिका घेतली असून, ओबीसी समाजासाठी शैक्षणिक सवलती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.यावेळी प्रा. झोळ यांनी सांगितले की, आपण अपक्ष निवडणूक लढवत असलो तरी शेतकरी संघटनेच्या वतीने उमेदवारी जाहीर केली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खासदार राजू शेट्टी यांच्याशी चर्चा सुरू आहे. अखेर, प्रा. रामदास झोळ यांनी करमाळा तालुक्यातील सर्वांगीण विकासासाठी जनतेच्या आग्रहास्तव निवडणूक लढवण्याची ठोस धारणा व्यक्त केली. आपण दिलेल्या संधीचे सोने करणार, असे त्यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांसह महिलांना कल्याणकारी योजनांपासून वंचित ठेवले जाऊ नये

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारतीय किसान संघाच्या नेतृत्वाखाली राज्यातील शेतकरी आणि महिलांच्या मागणीस्तव राज्यभरातील जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महत्त्वपूर्ण निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात शेतकरी आणि महिलांना कल्याणकारी योजनांच्या लाभापासून तांत्रिक कारणांमुळे वंचित ठेवले जाऊ नये, अशी विनंती करण्यात आली आहे.

राज्य सरकारने शेतकरी आणि जनतेसाठी लाडकी बहीण, अतिवृष्टी आपत्कालीन सहकार्य, लाभकारी हमीभाव, बोनस यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना जाहीर केल्या आहेत. तथापि, आधार लिंकिंग, पॅन क्रमांक आणि आधार ऑथेंटिकेशन यांसारख्या तांत्रिक अडचणींमुळे लाखो पात्र लाभार्थी या योजनांपासून वंचित राहिले आहेत. या समस्यांमुळे सरकारचा उद्देश सफल होत नाही, असा शेतकऱ्यांचा आक्रोश भारतीय किसान संघाने निवेदनाद्वारे व्यक्त केला आहे.झारीत लपलेल्या शुक्राचार्यासारखे काही सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडेलतट्टू आणि निष्क्रियतेमुळे प्रशासनातील अडथळे वाढले आहेत, ज्यामुळे या योजना योग्यरित्या लागू होत नाहीत. गाजर दाखवणे परंतु ते हाताला न लागणे, अशा प्रकारची ही परिस्थिती असून, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे.शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी तातडीने नियमांमध्ये सुधारणा करून अंमलबजावणी प्रक्रिया सुलभ आणि गतिमान करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, तांत्रिक कारणांमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना भारतीय किसान संघाच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.याप्रसंगी पुंडलिक नाना चाफे, भिकन घुले, भाऊसाहेब कचकुरे, हरिभाऊ दांडगे, अजय गुप्ता, अनंत मधुकर गुप्ता, राजेंद्र नलावडे, विश्वास नवपुते, विजय सिंनगर आदी उपस्थित होते.

# टप्प्यात आला की कार्यक्रम केला:आधीच्या सरकारला फक्त मेरी आवाज सुनो एवढेच माहिती होत-एकनाथ शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सातारा (वृत्तसंस्था)**

काही लोकांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचे विचार सोडून पक्ष विकायला काढला तेव्हा अनेकजण माझ्याकडे उठाव केव्हा करायचा? अशी विचारणा करत होते. तेव्हा मी त्यांना योग्य वेळ येईपर्यंत थांबण्याचा सल्ला देत होतो. अखेर टप्प्यात आले आणि कार्यक्रम झाला, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघात केला. आधीच्या सरकारला फक्त मेरी आवाज सुनो एवढेच माहिती होते, असेही ते यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मंगळवारी सातारा जिल्ह्यातील पाटण येथे सभा झाली. या सभेद्वारे त्यांनी मतदारांना पुन्हा एकदा शिवसेनेच्या उमेदवारांवर विश्वास दाखवण्याचे आवाहन करत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीकेची झोड उठवली. एकनाथ शिंदे म्हणाले, आधीचे सरकार जनतेचे काहीही ऐकत नव्हते. त्यांना केवळ मेरी आवाज सुनो एवढेच माहिती होते. घरात बसून फेसबुक लाईव्ह करून राज्यशकट चालत नाही. त्यासाठी लोकांच्या बांधावर जावे लागते. शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकाव्या लागतात. केवळ कोमट पाणी प्या म्हणून चालत नाही. लोकांच्या पोटाला काय पाहिजे हे देखील पहावे लागते. कोविड महामारीच्या काळात मी स्वतः पीपीई किट घालून लोकांमध्ये गेलो.काही लोकांनी बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार सोडले. पक्ष विकायला काढला. यामुळे शिवसेनेचे खच्चीकरण सुरू झाले. यामुळे आमचे कार्यकर्ते व शंभूराज देसाई मला आपण उठाव केव्हा करायचा? असा प्रश्न करत होते. त्यावेळी मी त्यांना थांबा आपण वेळेवर सर्वकाही बरोबर करू असे सांगत होतो. करेक्ट कार्यक्रम करण्यासाठी वेळ साधायची असते. सर्वकाही टप्प्यात यावे लागते. अखेर टप्प्यात आले आणि आम्ही कार्यक्रम केला, असे एकनाथ शिंदे यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले.

एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही उठाव केला त्यावेळी शंभूराज देसाई २ पाऊले माझ्यापुढे होते. त्यामुळे मी त्यांना २ जिल्ह्यांचे पालकमंत्री बनवले. एक सातारा व दुसरे ठाणे. ते माझ्या खांद्याला खांदा लावून पुढे राहिले. आपण कुठे जात आहोत? असा कोणताही प्रश्न त्यांनी विचारला नाही. त्यांनी छातीचा कोट करून लढाई लढली आणि मला पाटणचे पाणी दिसले. पाटणमध्ये कुणीही आले तरी पाटणचा गड शंभूराज देसाई हेच राखणार याची मला खात्री आहे.आपल्या मतदारसंघात काय पाहिजे आणि काय नाही? हे शंभूराज देसाई यांना माहिती आहे. ते येथून ३ वेळा निवडून आलेत. यावेळी ते चौकार मारतील. लोकप्रतिनिधी कसा असावा? याचे उत्तम उदाहरण शंभूराज देसाई हे आहेत. त्यांनी या मतदारसंघासाठी २,९२० कोटींचा निधी आणला. आम्ही उठाव केला नसता तर एवढा निधी या मतदारसंघाला मिळाला असता का? मागच्या सरकारमध्ये हे शक्य नव्हते. कारण ते सरकार बहिरे होते, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी बोलताना म्हणाले.



## आंध्रा बसचा मुक्काम आता महर्षी चौक ऐवजी महाराष्ट्र बस स्थानकात

# धर्माबाद मधील तहसीलदार मैडम यांना ६ महीन्याची मुदत देऊन पण त्या लेखी पत्राचे अंमलबजावणी कधी होईल?

### तेलंगाना भैंसा डिपो मॅनेजर यांची कालावधी ची मुदत संपली;आचारसंहिता संपल्यानंतर रिपब्लिकन सेना अखेर मैदानात उतरणार?







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद | साहेबराव दुगाने**

महाराष्ट्र शासनाचा व राष्ट्रीय परिवहन महामंडळ यांचा महसूल बुडत आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राची अंमलबजावणी होत नसून अनाधिकृत आंध्रा बस स्टॉप हे महर्षी वाल्मिकी चौक येथे राष्ट्रीय राष्ट्रीय परिवहन महामंडळ विभागासोबत कसलाही करार तेलंगाना येथील आगारप्रमुखांनी न करता तेलंगणातील बसेस चालूच ठेवल्या.

सविस्तर वृत्त असे की

धर्माबाद ही एक मोठी बाजार पेठ असून दररोज आंध्रा प्रदेश व तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून हजारो लोक विविध कामांच्या निमित्ताने धर्माबाद शहरात येत असतात. तालुक्यात महाराष्ट्र बस स्थानक आहे तेलंगणातील काही बस सेवा फक्त महर्षी चौक पर्यंतच येऊन तिथून परतत होतात त्यामुळे इतर नागरिकांना चक्क महाराष्ट्र बस स्थानकापासून महर्षी चौक पर्यंत पायी चालत जावे लागते किंवा ऑटो ने तीस रुपये देऊन जावे लागत असे याचा त्रास महाराष्ट्रातून आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांना होत होता म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने, डी के पाटिल व वंचित बहुजन आघाडी चे शहर उपाध्यक्ष किरण गजभारे, राहुल शिरसे यांनी व सहकार्यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांच्या नेतृत्वात महर्षी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत धर्माबाद तहसीलदार यांनी भैसा व निर्मल वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदर आंदोलनांची माहिती देत तेलंगणा राज्यातून येणाऱ्या बसेस महर्षी चौक अनधिकृत ( आंध्रा बस स्टॉप) येथे थांबवण्या ऐवजी ते अधिकृत महाराष्ट्र बसस्थानकात थांबवण्यात यावेत अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी लेखी विनंती वजा सल्ला दिला होता.

या रास्ता रोको आंदोलनाच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक नांदेड, धर्माबाद तहसीलदार व पोलीस निरीक्षक व तेलंगणा राज्याच्या आगार प्रमुख यांना देण्यात आले होते.

या दरम्यान सर्व बाबींची चौकशी करून नायब तहसीलदार गावंडे यांनी तोंडी व लेखी आश्वासन दिले व सदरील विभागाला पत्रव्यवहार केला त्यामुळे आज पासून (आंध्रा बस स्टॉप) च्या ऐवजी महाराष्ट्र व स्थानक या ठिकाणी तेलंगणातील सर्व बसेस थांबण्यात येणार आहे. त्यामूळे महाराष्ट्रातून आंध्र व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या धर्माबाद तालुका वाशीयांसाठी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून धर्माबाद शहरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय या पुढे होणार नसल्याने समाधान व्यक्त केल्या जात आहे. परंतु तहसीलदारांचा आदेश तेलंगानातील आगार प्रमुख यांनी कचऱ्याच्या डब्यात टाकून आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. याकडे वाहतूक शाखेने सुद्धा कानाडोळा केला आहे. अनधिकृत आंध्रा बस स्टॉप या ठिकाणी बसेस थांबून विद्यार्थी नागरिक व्यवसायिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**मा. तहसीलदार साहेबांनी या सर्व बाबींची दखल घेऊन लवकरात लवकर हा अजब गजब कारभार थांबवावा अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित प्रशासन जबाबदार असेल –(संजय पवार माजी नगरसेवक)**

**ही मागणी तालुक्यातील व्यापारी वर्ग शिक्षक प्रवासी कर्मचारी यांच्या हितासाठीच आहे व या मागणीचा शासनाने दखल घेऊन लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी भाजप पक्ष आंदोलन करताना जाहीर पाठिंबा असणार आहे. –(रवींद्र पोतगंठीवार)**

**धर्माबाद हे तेलंगाना सीमा वरती भाग असून व्यापारासाठी दळणवळणासाठी शैक्षणिक क्षेत्र इत्यादींसाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे तेलंगणातील बस हे महाराष्ट्र बस स्थानकात येत नसल्यामुळे प्रवाशांना ऑटोला वेगळे पैसे मोजावे लागत आहेत. यात प्रवाशांची गैरसोय होत आहे. –(गणेश गिरी)**

**तहसीलदारांच्या पत्राचा आदेश स्थानिक प्रशासनाने कोरा पेपर म्हणून वाळीत ठेवला. म्हणून तेलंगणातील बस महाराष्ट्र बस स्थानकात येण्याऐवजी अनधिकृत (आंध्रा बस स्टॅन्ड) येथेच येऊन परत तेलंगाना रवाना होत आहे.यात तालुक्यातील एका मोठ्या अधिकाऱ्याने लाच घेतली का! असा प्रश्न जनतेतून निर्माण होत आहे.**




**महाविकास आघाडीचे नेते श्री भास्करराव पाटील शिंदे जोमेगावकर नांदेड जिल्हा उपाध्यक्ष नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी यांनी लोहा येथे शिवसेना पक्षप्रमुख श्री उध्दव बाळासाहेब ठाकरे साहेब यांची भेट घेऊन चर्चा केली.**

## निवडणूक निरीक्षक ए.गोविंद राज यांनी घेतला मुखेड येथील निवडणूक विषयक कामाचा आढावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड | शिवकुमार बिरादार**

मुखेड , दि. ८ नोव्हेंबरः– मुख्य खर्च निरीक्षक ए. गोविंदराज यांनी आज ९१–मुखेड विधानसभा मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयास भेट देवून निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अनुप पाटील व सहाय्यक निवडणूक अधिकारी राजेश जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. खर्च निरीक्षक ए. गोविंदराज यांनी खर्च कक्षातील कामाची पाहणी करुन, मिडीया कक्षामार्फत होत असलेल्या कामाची पाहणी केली. खर्च कक्षातील उमेदवारांच्या खर्चाचे रजिस्टरची तपासणी केली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अनुप पाटील,



निवडणूक विभागाचे नायब तहसिलदार जोहरे, एस.बी. नरमीटवार, प्रशांत लिंबेकर, महाडीवाले, तलाठी देशमुख, मिडीया कक्ष प्रमुख उत्तम नारलावार, शिवशंकर कुच्चेवाड, संजय येनुरवार, रफिक बागवान इत्यादी उपस्थित होते.



**लोहा येथील सभेत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांनी लोहा तालुका उपप्रमुख संतोष पाटील कापसीकर यांना स्टेजवर बोलावून २० तारखेच्या नंतर कापलेल्या बोटांचा हिशोब घेतला जाईल अशा विरोधकांना इशारा दिला आहे**

## रब्बीच्या तोडांवर शेतकऱ्यांना मोठा दिलासा

# पिंपळगाव रेणुकाई येथे दहा एम.एव्ही.ए.चे रोहीत्र मिळाल्याने अकरा गावातील शेतकऱ्यांची विजेची कटकट मिटणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील ३३ केव्ही उपकेंद्रात नुकतेच दहा एम.एव्ही.चे रोहीत्र उपलब्ध झाले आहे.याचे काम किमान महिनाभरात पूर्ण होणार असल्याचा दावा महावितरणने केला आहे.त्यामुळे अकरा गावातील किमान ३५०० हजार शेतकऱ्यांचा विज पुरवठा सुरळीत होणार असल्याने शेतातील व गावातील विजेच्या गंभीर प्रश्न निकाली लागला आहे.यामुळे विजेच्या कायम होत असलेल्या लपडंवापासुन शेतकऱ्यांची कायमची सुटका होणार असल्याने शेतकरी समाधानी झाले आहे.सध्या रब्बी हंगात जोरात सुर असल्याने शेतकऱ्यांना विज पुरवठा पूर्ण छमतेने मिळला पाहीजे. यामुळे पिकांना पाणी देणे सुलभ होणार आहे.यावर्षी रब्बी पिकांना विजेमुळे पाणी वेळेत देता येणार असल्याने शेतकऱ्यांच्या रब्बी उत्पादनात वाढ होणार असल्याचे शेतकरी आनंदाने सांगत आहे.यापूर्वी देखील या ठिकाणी पाच एम.एव्हीचे दोन रोहीत्र रोहीत्र आहे.आता आणखी हा हे दहाचे रोहीत्र बसणार असल्याने शेतकऱ्यांची कायमची विजेची



कटकट मिटणार आहे. तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे महावितरणचे विद्युत उपकेंद्र आहे.या ठिकाणी सुरूवातीला दोन पाच एम,एव्ही.ए.चे तर दुसरे तीन एम.व्हि.ए.चे असे एकुण दोन विद्युत रोहीत्र होते.या रोहीत्रावरुन परिसरातील अकरा गावातील शेतकऱ्यांना शेतीसाठी व गावासाठी विजपुरवठा होत होता.मात्र या कमी क्षमता असलेल्या विद्युत रोहीत्रावर विजेचा भार अधिक होत असल्यामुळे वारंवार विज पुरवठा खंडीत होणे,फ्युज कट होणे,विद्युत रोहीत्र जळणे,तार तुटणे,स्पारकींग होणे अशा विविध घटना वारंवार प्रत्येक गावात घडत होत्या.त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी खरिपात व रब्बीत देखील मोठी अडचण निर्माण होत होती.यामुळे शेती उत्पादनावर देखील मोठा परिणाम होत होता.शिवाय शेतकऱ्यांना एक एकर शेती ओलीती करण्यासाठी किमान आठवडा भर कालावधी लागयचा त्यामूळे शेतकऱ्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत होता.याबाबत महावितरणकडे अनेक वेळा तक्रारी करुन देखील काहीच उपयोग होत नसल्याने अखेर शेवटी परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येत आपली कैफीयत मतदारसंघातील लोकप्रतीनिधीकडे मांडली. त्यांनी देखील शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न असल्याने महावितरण कंपनीकडे पाठपुरावा करुन परिसरातील शेतकऱ्यांसाठी यापूर्वी पाच.एम.व्ही.ए चे आणि आता दहा एम.एव्हीच्या रोहीत्र गावात पाठपूरावा करीत उपलब्ध करुन दिले.सध्या येथील उपकेंद्रावरुन पिंपळगाव रेणुकाई,पारध बु,पारध खु, माळेगाव,रेलगाव,मोहळाई,लेहा,शेलुद,अवघडराव सांवगी,वरुड,कोसगाव,कोळेगाव या अकरा गावातील जवळजवळ ३ हजार ५०० शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न मार्गी लागला आहे.यंदा मौसमी व परतीच्या पावसाने परिसरात धुव्वाधार हजेरी लावल्याने सगळीकडे मुबलक पाणीसाठा जमा झाला असल्याने यंदा दुपटीने रब्बीच्या पेर्यात वाढ होणार आहे.सध्या शेतकऱ्यांचे पिंकाना पाणी देण्याचे नियोजन सुरू असुन विज पुरवठा सुरळीत असल्यामुळे शेतकऱ्यांनी आतापर्यंत पिंकाना दोन ते तीन पाणी पिकांना दिले आहे.रब्बी पिंकाना देखील वेळेवर पाणी मिळत असल्यामुळे परिसरात रब्बी चांगलीच बहरली असल्याचे चित्र आहे.आमदार दानवे यांच्या माध्यमातून हे काम मार्गी लागले असल्याने परिसरातील शेतकरी समाधान व्यक्त करीत आहे.

**शेतकऱ्यांचे जिवनमान उंचावले पाहीजे.....शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे जिनवमान उंचवण्यासाठी अधीक प्रयत्न करणे गरजेचे आहे.पिंपळगाव रेणुकाई येथे नुकतेच दहा एम.एव्ही.चे रोहीत्र उपलब्ध झाले आहे.त्यामुळे अकरा गावातील ग्रामस्थ तसेच शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न कायम निकाली लागला आहे.या भागातील शेतकऱ्यांची विजेसाठी होणारी प्रंचड परवड थांबण्यास मदत होणार आहे.याचे समाधान वाटत आहे...रांजेद्र देशमुख.ग्रामस्थ पिंपळगाव रेणुकाई**

**विजेची कटकट मिटली......गेल्या अनेक वर्षापासून आम्हाला विजेचा त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे शेती करणे अवघड आहे.शेती उत्पादनात देखील घट होत होती.मात्र आता दहा.एम.व्हि.ए.च्या विद्युत रोहीत्रामुळे विजेपासुन होणाऱ्या त्रासापासुन मुक्तता होणार आहे.आता विजपुरवठा सुरळीत मिळणार असल्याने असल्याने यंदा रब्बीत हमखास वाढ होणार आहे......रामेश्वर लक्कस शेतकरी पारध खुर्द.......**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904